# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्रमांक : २०३/२०१२

मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शिख, व पारशी या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक शिक्षणासाठी केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष सन २००७–२००८ पासून महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज केंद्र शासनाच्या **www.momascholarship.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या शिष्यवृत्ती योजनेसंदर्भातील सूचना तसेच जाहिरात उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रसिध्द केली असून सदरची जाहिरात व प्राचार्यांसाठीच्या सूचना सोबत जोडल्या आहेत. पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त संस्थांच्या प्रमुखांना कळविण्यात येते की, जास्तीत जास्त अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे सदर शिष्यवृत्तीसाठीचे ऑनलाईन अर्ज भरुन घेण्यात यावेत.

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : प.प्रवेश/४१९४
दिनांक : २४/९/२०१२

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१
Web:www.dirde.org E-mail:info@dirhe.org.in

फॅक्स नं.०२०/२६१२११५३

फोन नं.०२०/,२६१२६९३९


दि. ०१/०९/२०१२

क्र.उशिसं/पीएमएस ऑनलाईन/२०१२-१३/१४अई/15456

प्रति,

१. संचालक, उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१
२. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषी/तंत्र पशुविज्ञान/आरोग्यविज्ञान/मुक्तविद्यापीठे.)

**विषय : १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१२-१३ पासून ऑन लाईन पध्दतीने राबविण्याबाबत.**

संदर्भ : या संचालनालयाची विषयांकित योजनेची दिनांक १५ व १८ ऑगस्ट २०१२ रोजीच्या प्रमुख वर्तमान पत्रातील जाहिरात.

उपरोक्त विषयी, मुस्लीम, ख्रिचन, बौध्द, शिख व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक शिक्षणासाठी १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष सन २००७-२००८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोयीस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विघार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा म्हणून केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून एन आय सी मार्फत ही योजना ऑन लाईन पध्दतीने सन २०१२-१३ पासून राबविण्यात येत आहे. सदरहू शिष्यवृत्तीचा अर्ज केंद्र शासनाच्या **www.momascholarship.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सन २०१२-१३ पासून केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून एन.आय.सी. मार्फत ऑन लाईन पध्दतीने राबविण्यात येत असलेल्या अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीच्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अमंलबजावणी करुन अल्पसंख्यांक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ पोहोचावा यासाठी आपल्या विभागाच्या अधिनस्त महाविद्यालयांचे/ शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभाग प्रमुख यांना याबाबत आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे संबंधित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यांच्या प्राचार्य/विभाग प्रमुखांच्या कार्यशाळा आयोजित करुन जास्तीत जास्त अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे सदर शिष्यवृत्तीसाठीचे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे बाबतचे निर्देश आपल्या स्तरावरुन संबंधितांना देण्यात यावेत, ही विनंती. सोबत प्राचार्यांना द्यावयाच्या सुचना आणि जाहिरातीचा नमुना जोडून पाठविण्यात येत आहे.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
तथा नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचे करीता

ORDER FILE 2012-13

## अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती सन २०१२-१३ च्या ऑन-लाईन राबविण्यांसंदर्भात प्राचार्यांना सूचना

१०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी विषयांकित योजनेची जाहिरात दिनांक १५ व १८ ऑगस्ट, २०१२ रोजी दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक नवभारत, दैनिक लोकसत्ता, दैनिक इंडियन एक्सप्रेस, दैनिक इन्कलाब, या वर्तमानपत्रात देण्यांत आलेली आहे.

१. संबंधीत प्राचार्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांच्या विभागप्रमुखांचे अध्यक्षतेखाली दोन प्राध्यापक व शिष्यवृत्ती विभागातील कर्मचारी यांचा एक स्वतंत्र कक्ष (सेल) स्थापन करावा. तसेच, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना आपल्या कार्यालयात संगणक कक्ष (इंटरनेट सुविधांसह) उपलब्ध करुन देण्यांत यावा, जेणेकरुन विद्यार्थ्यांना ऑन-लाईन अर्ज करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन व मदत मिळेल. **कोणताही विद्यार्थी ऑन-लाईन अर्ज करण्यासापासून वंचीत राहणार नाही याची अतीव दक्षता घ्यावी. अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती सन २०१२-१३ साठीच्या दिलेल्या जाहिरातीतील वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे.**

२. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सूचीत करण्यांत येते की, त्यांनी केंद्र शासनाच्या www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला सदरहू शिष्यवृत्तीचा अर्ज ऑन-लाईन भरावा. सदर अर्ज ऑन-लाईन भरल्यानंतर त्याची हार्ड कॉपी आवश्यक त्या सह पत्रांसह आप-आपल्या महाविद्यालयांकडे जमा करावीत.

३. प्राचार्यांनी ऑन-लाईन भरलेल्या अर्जाची **Print Out (Hard Copy) आवश्यक त्या सहपत्रांसह** देखील विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घ्यावी. अशा रितीने विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले व सदरील शिष्यवृत्तीच्या अटी व शर्ती पूर्ण करीत असलेले अर्ज, तपासून प्रमाणित करावेत व तदनंतरच असे सर्व अर्ज (नाकारलेल्या अर्जासहीत) आपल्याशी संबंधीत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांकडे (मुंबई, पनवेल, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, जळगांव, नांदेड, अमरावती व नागपूर) जमा करावेत. अर्ज तपासतांना अर्जामधील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात भरलेली फी/ पालकांचे उत्पन्न / विद्यार्थ्यांची कम्युनिटी / विद्यार्थ्याने मागील परीक्षेमध्ये दर्शविलेले गुण इत्यादि बाबी कटाक्षाने पाहाव्यात. प्राचार्यांनी प्रमाणित न केलेले मूळ अर्ज शिष्यवृत्ती करिता ग्राहय धरलेले जाणार नाहीत. याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्या-त्या प्राचार्यांची असेल.

४. स्टेट बँक इंडियाने त्यांच्याशी झालेल्या करारानुसार अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शून्य अनामत रकमेवर खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे हे विद्यार्थ्यांना अवगत करावे.

५. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांकडून अर्जाची हार्ड कॉपी स्वीकारत असतांना त्यावर नवीन (Fresh) किंवा नूतनीकरण (Renewal) अशी नोंद करुन घेणे आवश्यक आहे.

६. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून अर्ज भरण्यास सांगावे.

७. संदर्भीय शासन निर्णयामध्ये, नमूद केलेल्या, सन २०१२-१३ पासून ऑन-लाईन पध्दतीने राबविण्यांत येत असलेल्या अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीच्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अमंलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थांच्या प्राचार्य/विभागप्रमुख यांचीही असेल.

